# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.०७.२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक २०/०७/२००६ रोजी मा.महापौर,मा.उपमहापौर यांचे अनुपस्थितीत महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा जेष्ठ स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे सकाळी ११.४० वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली . सभेला प्रआयुक्त , नगर सचिव यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.रेणुकादास वैद्य
०२. स.स.श्री.संतोष खेंडके (पाटील)
०३. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०४. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०५. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
०६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
०७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
०८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
०९. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
११. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
१२. स.स.श्री.खान निसार मो.खान
१३. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
१४. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
१५. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
१६. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१७. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
१८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
२०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र माणिकराव

**चर्चा :**

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचीचे प्रकरण- २ चे नियम १ (ग) नुसार प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान सभा भरण्यासाठी नेमलेल्या वेळी महापौर उपस्थित असेल तर त्याने स्विकारले पाहिजे आणि महापौरचे पद रिकामे असेल किंवा महापौर अनुपस्थित असेल तर उपमहापौराने किंवा उपमहापौराच्या अनुपस्थितीत सभेकडून या प्रसंगी अध्यक्ष म्हणून निवडण्यात येईल. अशा उपस्थित असलेल्या पालिका सदस्यापैकी एका पालिका सदस्याने अध्यक्षास्थान स्वीकारले पाहिजे. अशी तरतूद आहे. आजच्या सभेसाठी पिठासीन अधिकारी म्हणून सभागृहातील सदस्यांनी नाव सूचवावे.

श्री. संतोष खेंडके : आजच्या सभेसाठी पिठासीन अधिकारी म्हणून माजी महापौर तथा स. सदस्य श्री.गजानन बारवाल यांचे नाव सूचविण्यात येते.

श्री.त्र्यंबक तूपे, श्री.महेश माळवतकर : यास माझे अनूमोदन आहे.

नगर सचिव : आजच्या सभेचे अध्यक्षस्थानी स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांचे नाव सूचविलेले आहे. व त्यांना अनुमोदनही देण्यांत आलेले आहे व इतर कूणाही पालिका सदस्यांचे नांव सूचविण्यात आलेले नसल्याने, त्यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्विकारावे.

याच वेळी स.सदस्य श्री.गजानन बारवाल यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.

पिठासीन अधिकारी : आजच्या सभेला मा.महापौर उपमहापौर तसेच मा. आयुक्त उपस्थित नाही. मुंबई येथे शासकीय कामा निमित्ताने गेलेले आहे. मला आपण सर्वांनी संधी दिली. त्याबद्दल आपण सर्वांना धन्यवाद देण्यांत येते.

श्री. संतोष खेंडके :आजच्या सभेसाठी कोरम नाही तसेच मा. आयुक्त ही उपस्थित नाही. सभा तहकूब करावी.

श्री. हिम्मतराव दाभाडे : आजच्या सभेला मा. महापौर उपमहापौर तसेच मा. आयुक्त उपस्थित नसल्याने योग्य ते निर्णय घेता येणार नाही.

श्री. भाऊसाहेब ताठे : आजची सभा तहकूब करण्यात यावी.

श्री. रविकांत गवळी : सभा तहकूब करण्याची जी सूचना स.सदस्यांनी केली त्यास माझे अनुमोदन आहे.

पिठासीन अधिकारी : सभागृहाचे मत लक्षात घेता आजच्या सभेसाठी कोरम पूर्ण नसल्यामूळे सभा तहकूब करण्यात येते. पूढील सभेची तारीख स.सदस्यांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

या बरोबरच आजची सभा तहकूब केल्याचे मा.पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.